MHRG080011632019 नियमीत दिवाणी दावा क्र. ७९/२०१९

श्री.श्रीकांत साळवी व.१
वि.
श्री.संतोष मोरे वगैरे

## नियमीत दिवाणी दावा क्र.७९/२०१९ मधील
## निशाणी क्र.५९ खालील आदेश

प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादींनी त्यांच्या विरुध्द निशाणी क्र.५८ वर झालेला म्हणणे नाही असा आदेश रद्द करुन म्हणणे दाखल करण्याची परवानगी मागितली आहे.

०२. प्रतिवादी अर्जात कथन करतात की, निशाणी क्र.५८ वरील अर्ज कोविड-१९ साथरोगापुर्वी वादींनी दिलेला होता. त्यानंतर, प्रतिवादी क्र.१ चे आरोग्य व्यवस्थित नसल्यामुळे त्याला न्यायालयात हजर राहता आले नाही. त्यानंतर, लगेचच कोविड-१९ साथरोगाच्या अनुषंगाने टाळेबंदी लागु झाली, त्यामुळे न्यायायलयाचे कामकाज थांबविण्यात आले होते. न्यायालयाचे कामकाज पुर्ववत चालु झाले त्यावेळी प्रतिवादी क्र.१ चा मृत्यु झाला होता. त्यामुळे त्याच्यावतीने न्यायालयात हजर राहता आले नाही. सबब प्रतिवादींतर्फे अर्ज मंजुर करुन त्यांना निशाणी क्र.५८ ला म्हणणे सादर करण्याची परवानगी मिळावी अशी विनंती करण्यात आली.

०३. त्याउलट, वादींनी प्रस्तुत अर्जास हरकत नोंदविलेली आहे. त्यांचे असे कथन आहे की, प्रतिवादींना बरीचशी संधी देऊनदेखील त्यांनी म्हणणे सादर न केल्यामुळे, त्यांच्याविरुध्द म्हणणे नाही असा आदेश पारित करण्यात आलेला आहे. सबब, वादींनी खर्चासह अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०४. उभय पक्षकारांतर्फे विधीज्ञांनी केलेला युक्तीवाद ऐकला.

०५. प्रकरणाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा वादींनी प्रतिवादींविरुध्द हक्क प्रस्थापनेकरिता अतिक्रमण काढून मिळण्याकरिता व निरंतर मनाईकरिता दाखल केलेला आहे. वादींनी निशाणी क्र.५८ अन्वये दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १२, नियम ६ प्रमाणे अर्ज दि.१०/०१/२०२० रोजी दाखल केलेला होता. त्यावर प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादींचे म्हणणे दाखल करण्याकरिता दि.१७/०१/२०२०, २७/०१/२०२०,१५/०२/२०२० अशा टाळेबंदी पुर्वीच्या तारखा नेमण्यात आलेल्या

होत्या. परंतु, त्यांनी टाळेबंदीपुर्वी संधी देऊन देखील म्हणणे न दाखल केल्यामुळे व त्यानंतर जानेवारी २०२१ पासुन मार्च २०२१ पर्यंत नियमित कामकाज चालु होवून देखील त्यांनी म्हणणे न सादर केल्यामुळे त्यांच्याविरुध्द दि.०८/०२/२०२१ रोजी म्हणणे नाही असा आदेश पारित करण्यात आला. अभिलेखाचे अवलोकन केले असता, प्रतिवादीशिवाय इतर प्रतिवादींपैकी कोणीही एक न्यायालयाचे कामकाज विधीज्ञांमार्फत पाहु शकत होते. परंतु, त्यांनी बरीचशी संधी देऊन देखील म्हणणे दाखल केलेले दिसत नाही. त्यामुळे, अर्जातील कारण हे संयुक्तीक कारण वाटत नाही. परंतु, अर्जाचा गुणदोषावर निर्णय करण्यासाठी प्रतिवादींना संधी देणे न्यायोचित आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे:-

**:-आदेश-:**

| | |
|---|---|
| ०१. | अर्ज(निशाणी क्र.५९)रक्कम रु.५००/- च्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहे. खर्चाची रक्कम वादींना देण्यात यावी. |
| ०२. | खर्चाची रक्कम वादींना दिल्यानंतर प्रतिवादीला म्हणणे दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे. |

**(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)**

सही/-

**(श्री.पी.एम.माने )**

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
खालापूर.

दिनांकः ११/१०/२०२१
खालापूर.